# दिवा न्यूज

दिशादर्शक, मार्गदर्शक!

▶ वर्ष–३

■ अंक–७

■ epaper.diwanews.com ■ सोमवार, १८ सप्टेंबर २०२३ ■ पाने–८ ■ किंमत ४ रु. ■ RNI No.-MAHMAR/2021/80669 ■ www.diwanews.com


**माझं मंडळ अध्यक्ष जाणार हे दिव्यातील शिंदे गटाचे नेते दोन महिन्यापासून सांगत होते**



(संबंधित वृत्त पान ३ वर)

# दिव्याच्या विकासासाठी भाजप प्रयत्नशील

## शहरात भाजप संघटना अधिक मजबूत करणार!

### नवनियुक्त दिवा शहर मंडळ अध्यक्ष सचिन भोईर यांची भूमिका



**दिवा:– भारतीय जनता पार्टीचा दिवा शहरात मोठा जनाधार असून शहराच्या विकासासाठी भाजप प्रयत्नशील आहे.दिवा शहरात भाजप संघटना अधिक मजबूत करण्यावर आपला भर असेल अशी भूमिका दिवा भाजपचे नवनियुक्त मंडळ अध्यक्ष सचिन भोईर यांनी दिवा न्यूज सोबत संवाद असताना मांडली.**

भारतीय जनता पार्टीच्या जिल्हा नेतृत्वाने कमी वयात आपल्यावर विश्वास दाखवत दिवा शहर मंडळ अध्यक्ष पदाची जबाबदारी सोपवल्याबद्दल सचिन भोईर यांनी पक्ष नेतृत्वाचे आभार मानले आहे. भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून दिवा शहराच्या विकासासाठी जे करता येईल ते करण्याचा प्रामाणिक प्रयत्न आपला राहील असे सचिन भोईर यांनी यावेळी सांगितले. पक्षाची भूमिका, पक्ष नेतृत्वाने दिलेले कार्यक्रम आणि दिव्यातील जनतेचा विश्वास याच्या जोरावर दिवा शहरात भारतीय जनता पार्टीची पक्ष संघटना अधिक मजबूत करणे हे आपले प्राथमिक लक्ष असल्याचे सचिन भोईर यांनी म्हटले आहे.

दिवा शहरातील पक्षाचे कार्यकर्ते आणि पदाधिकारी जनतेच्या हितासाठी कायम कार्यरत असून सर्वसामान्य दिवेकरांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याकडे आपला कल असेल असेही सचिन भोईर यांनी म्हटले आहे. पक्षात जास्तीत जास्त तरुणांना संधी कशी देता येईल याकडे विशेष लक्ष दिले जाणार असून पुढील काही वर्षाचा विचार करून पक्ष संघटनेची बांधणी केली जाणार असल्याचे सचिन भोईर यांनी म्हटले आहे.

देशाचे प्रधानमंत्री नरेंद्रजी मोदी यांचे विकासाचे व्हिजन जनतेपर्यंत घेऊन जाण्यासाठी विविध उपक्रम दिवा भाजपच्या माध्यमातून राबवले जाणार असून राज्य सरकारच्या माध्यमातून देवेंद्रजी फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली घेतले गेलेल्या निर्णय यांची माहितीही जनतेपर्यंत घेऊन जाण्याचे काम आम्ही भाजपच्या माध्यमातून करणार आहोत. टीका करण्याचे काम विरोधक करतील मात्र टीकाकारांच्या टीकेला कामातून उत्तर देण्याचा आमचा प्रयत्न राहील असेही सचिन भोईर यांनी म्हटले आहे.संपूर्ण दिवा भाजप एक टीम म्हणून यापुढे काम करताना दिसेल असा विश्वास सचिन भोईर यांनी व्यक्त केला आहे.

# ऐन गणेशोत्सव काळात दिव्यात पाणीटंचाई

## लवकरच पाणी प्रश्न सुटेल या राजकीय आश्वासनाला दिवेकर कंटाळले

**दिवा:–** ऐन गणेशोत्सवात दिवा शहरात पाणीटंचाई असल्याने नागरिकांचे हाल होत आहेत.सणासुदीच्या काळामध्ये पाणीटंचाई असून टँकरद्वारे पाणी विकत घ्यावे लागल्याने शहरातील नागरिकांचे आर्थिक गणित कोलमडत आहे.वारंवार भेडसावणाऱ्या पाणी समस्येमुळे शहरातील महिला संताप व्यक्त करत आहेत.

शहरातील मुंब्रा देवी कॉलनी, दिवा आगासन रोड मधील काही भाग, सद्गुरु नगर त्याचबरोबर साबे,दिवा स्टेशन परिसरातील अनेक नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत असल्याने नागरिक संताप व्यक्त करत आहेत.मागील पाच वर्षांपासून नागरिकांना कायमच पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. थोड्या दिवसात पाणीटंचाईचा प्रश्न निकालात निघेल,या राजकीय आश्वासनांना दिवा शहरातील नागरिक कंटाळले असून सणासुदीच्या काळात देखील पाणी पुरवठा होत नाही असा संताप नागरिक व्यक्त करत आहेत.सणासुदीच्या काळात पाणी पुरवठा होत नसल्याने नागरिकांतून पालिका प्रशासना विरोधात नाराजी व्यक्त होत आहे. टँकर पुरवठा करणाऱ्या लोकांना पाणी उपलब्ध होते,मात्र नागरिकांच्या नळाला पाणी येत नाही याबाबत देखील सामान्य नागरिकातून आश्चर्य व्यक्त होत आहे.दररोज ३०० ते ५०० रुपयांचा टँकर विकत घेणे सर्वसामान्य दिवेकरांना परवडत नसल्याने सणासुदीच्या काळात महापालिकेने संपूर्ण देवा शहरातील पाणीटंचाई असणाऱ्या भागात मोफत टँकरने पाणीपुरवठा करावा अशी मागणी आता नागरिकांतून होत आहे.

शहरातील अनेक भागांमध्ये दोन दोन दिवस पाणीपुरवठा होत नसून विकत घ्याव्या लागणाऱ्या पाण्यामुळे नागरिकांचे आर्थिक गणित कोलमडले आहे.




दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि. १८ सप्टेंबर २०२३
पान : २
www.diwanews.com

## चाकूने हल्ला करणाऱ्याला दहा वर्षांचा कारावास

**ठाणे:** ठाण्याच्या टिकुजिनी वाडी परिसरात उमेश वरघट यांच्यावर चाकूचा हल्ला करून त्यांना ठार मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या आशिष सुर्वे याला ठाणे सत्र न्यायालयाचे न्यायाधिश ए. एन. सिरसीकर यांनी दोषी ठरवत, त्याला दहा वर्षांच्या सक्त कारावासाची शिक्षा ठोठावली. तर सुपारी घेऊन त्याने हे कृत्य केले असा त्याच्यावर आरोप होता. तर ज्या व्यक्तीने ही सुपारी दिल्याचे पोलिसांनी म्हटले होते, त्याची सबळ पुराव्या अभावी न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली. यापूर्वीही आशिष याने उमेशवर चाकूने हल्ला करून त्याला जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला होता.

# छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयातील साफसफाईसाठी नवीन व्यवस्था



## ठामपा आयुक्त अभिजीत बांगर यांच्या उपस्थितीत झाला कार्यारंभ



**ठाणे :** ठाणे महापालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय, राजीव गांधी वैद्यकिय महाविद्यालय येथील साफसफाईच्या नवीन व्यवस्थेस बुधवार, १३ सप्टेंबरपासून सुरूवात झाली. नवीन कंत्राटाचा कार्यारंभ ठाणे महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांच्या उपस्थितीत सफाई कर्मचाऱ्यांच्या हस्ते करण्यात आला.

छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय, राजीव गांधी वैद्यकिय महाविद्यालय आणि आसपासचा परिसर यांच्या साफसफाईचे कंत्राट मे. कृष्णा कंस्ट्रक्शन यांना मिळाले आहे. त्यांचे १८० कर्मचारी तीन पाळ्यांमध्ये कार्यरत राहणार आहेत.

### रुग्णालय स्वच्छतेचा नवीन अध्याय

छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाच्या संपूर्ण कायापालटासाठी ठाणे महापालिका प्रशासन प्रयत्नशील आहे. या प्रक्रियेत रुग्णालय स्वच्छता हा महत्त्वाचा घटक आहे. रुग्णालयातील स्वच्छतेत आमूलाग्र बदल व्हावा यासाठी, तसेच, खराब काम खपवून घेतले जाणार नाही हा मुद्दा ठसविण्यासाठी कंत्राट व करारनाम्यातील अटी व शर्तींमध्ये टोकाच्या कारवाईचा अंतर्भाव करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे काम गुणवत्तापूर्ण नसेल तर कारवाई केली जाईल याची जाणीव कंत्राटदाराला करून देण्यात आली आहे. नवीन कामाच्या माध्यमातून रुग्णालय स्वच्छतेचा नवीन अध्याय रुग्णालयात सुरू होत आहे, असा विश्वास आयुक्त बांगर यांनी व्यक्त केला.

याप्रसंगी, आयुक्त बांगर यांनी सफाई कर्मचाऱ्यांशी संवाद साधला. पगार वेळेत होतील, याची खात्री बाळगा आणि तुमच्याकडून सफाईत कोणतीही कसूर होणार नाही, याची दक्षता घ्या, असे आयुक्त म्हणाले.

खराटा, फडके, बालदी हे स्वच्छतेचे रुप बदलून यंत्र, मॉप, डस्टर यांचा वापर सुरू होणार आहे. त्या यंत्रांची काळजी घ्यावी. त्यात काही छेडछाड झाली. जाणीवपूर्वक कोणी त्याचे नुकसान करण्याचा प्रयत्न केला तर त्यावर कडक कारवाई केली जाईल. कोणताही स्वच्छता कर्मचारी त्यांची यंत्र सामुग्री आणि सुरक्षा साधने या शिवाय दिसणार नाही, याची खबरदारी घेण्यास आयुक्तांनी सांगितले.

रुग्णालयात आल्यावर येणारा विशिष्ट प्रकारचा वास यापुढे येणार नाही, यासाठी उपाय करावेत. त्यासाठी कंत्राटदाराने तज्ज्ञांमार्फत सर्वेक्षण करावे. त्यांनी सुचवलेले बदल करून रुग्णालयातील स्वच्छतेची गुणवत्ता सुधारली जाईल, याची काळजी घ्यावी, असे निर्देशही आयुक्त बांगर यांनी दिले. शौचालयांच्या रचनेतील बदल, तसेच बांधकामातील काही दुरुस्त्या लवकरच केल्या जातील, असेही बांगर यांनी सांगितले.

### गुणवत्तेत आमूलाग्र सुधारणा अपेक्षित

छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांची संख्या लक्षात घेता येथील स्वच्छतेच्या स्थितीत आमूलाग्र सुधारणा अपेक्षित आहे. त्यादृष्टीने, कंत्राटदाराला यांत्रिक सफाईवर भर देण्यास सांगण्यात आले आहे. त्यासाठी सगळी नवीन यंत्र सामुग्री घेण्यात आली आहे. सफाई यंत्राची देखभाल, वेळच्या वेळी त्याची दुरुस्ती, जादा सफाई यंत्रे यावर लक्ष ठेवण्यात येणार आहे. तिन्ही पाळ्यात यंत्राद्वारे सफाई होईल. रात्रीच्यावेळी हॉस्पिटलमध्ये वर्दळ कमी असतानाही व्यवस्थित सफाई केली जावी.

१८० कामगार त्यांच्या पूर्ण क्षमतेने तिन्ही पाळ्यात कार्यरत राहतील. अनुपस्थिती कोणत्याही स्थितीत खपवून घेतली जाणार नाही, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. शौचालयांच्या स्वच्छतेसाठी तेथे कायमस्वरुपी कर्मचारी उपस्थित राहतील. त्यांच्याकडे तेच काम दिले जाईल. शौचालयनिहाय वेगळे कर्मचारी असतील. दिवसातून ठराविक वेळी नव्हे तर स्वच्छतागृहाचा वापर झाला की वेळोवेळी त्याची स्वच्छता केली जाईल.

सफाई कर्मचाऱ्यांना दिल्या जाणाऱ्या साधनांचा दर्जाही चांगला हवा. जंतूनाशके, सफाईची औषधे चांगल्या दर्जाची हवीत. याबद्दलच्या सूचना कंत्राटदारास देण्यात आल्या आहेत. कर्मचाऱ्यांचे गणवेशही नवीन देण्यात येत आहेत.

### सौजन्यपूर्ण वागणूक

रुग्णालयात येणारे रुग्ण, त्यांचे नातेवाईक, वैद्यकीय कर्मचारी यांच्याशी सौजन्याने वागावे. शिस्तीला कोठेही तडा जाऊ देऊ नये. कामकाजावर निरिक्षकांमार्फत नियंत्रण ठेवण्यात यावे. उपस्थितीसाठी दृष्टीपटलावर () आधारित बायोमेट्रिक पद्धती स्वीकारण्यात आली आहे. पाळीतील प्रत्येक कामगाराला दिवसातून तीनवेळा उपस्थिती नोंदवावी लागणार आहे. उपस्थिती काळात ओळखपत्र परिधान करणे अनिवार्य करण्यात आले आहे. रुग्णालय आणि परिसर स्वच्छ ठेवणे ही वैद्यकीय अधिक्षक यांची संपूर्णपणे जबाबदारी राहणार आहे.

### कर्मचारी हिताला सर्वोच्च प्राधान्य

सर्व सफाई कर्मचाऱ्यांचे वेतन वेळेत व्हावे. प्रत्येक कामगाराला त्याची सॅलरी स्लिप मिळावी. भविष्य निर्वाह निधी आणि राज्य विमा योजना यांची प्रदाने वेळेत जमा केली जावीत. या प्रदानांची पूर्तता केल्यावरच कंत्राटदाराचे मासिक देयक दिले जाईल, असेही करारनाम्यात नमूद करण्यात आले आहे. त्याची काटेकोरपणे अमलबजावणी केली जाणार आहे.

कार्यारंभाच्या वेळी ठाणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी, उपायुक्त (आरोग्य) उमेश बिरारी, डॉ. राकेश बारोट, डॉ. अनिरुद्ध माळगावकर आदी उपस्थित होते.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५
संपादक-सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669

दिशादर्शक, मार्गदर्शक!
**दिवा न्यूज**
सोमवार, दि. १८ सप्टेंबर २०२३
पान : ३
www.diwanews.com



### शिवकालीन किल्ले राज्य व संस्कृतीचे रक्षक – राज्यपाल रमेश बैस

**मुंबई:** राज्यातील प्रत्येक गडकिल्ल्याची स्वतःची गाथा आहे. रायगड, शिवनेरी, सिंहगड, प्रतापगड हे शिवकालीन किल्ले महाराष्ट्राचाच नाही, तर संपूर्ण देशाचा जिवंत सांस्कृतिक वारसा आहेत. राज्यातील किल्ले हे राज्याचे तसेच संस्कृतीचे रक्षक असून विशेषज्ञांच्या मदतीने त्यांचे रक्षण व जीर्णोद्धार केला पाहिजे. असे प्रतिपादन राज्यपाल रमेश बैस यांनी केले.

# माझं मंडळ अध्यक्ष जाणार हे दिव्यातील शिंदे गटाचे नेते दोन महिन्यांपासून सांगत होते



## भाजपचे रोहिदास मुंडे यांचा खळबळजनक दावा

**दिवा:–**पदाधिकारी नियुक्त करणे ही पक्षांतर्गत बाब आहे पण माझं मंडळ अध्यक्ष पद जाणार हे शिंदे गटातील दिव्याच्या नेत्यांना दोन महिन्यापासून माहीत होतं हे शिंदे गटाला आधीच माहीत होतं असा खळबळजनक खुलासा रोहिदास मुंडे यांनी केला आहे.

दिव्यात शिंदे गटाचे नेते रमाकांत मढवी यांच्या कार्यपद्धतीवर वारंवार टीका करत त्यांचा गैरकारभार उघडकीस आणल्यानेच आपल्याला जाणीवपूर्वक टार्गेट केले गेले का?असा प्रश्न काही हितचिंतक मला विचारतात.मात्र दिवा भाजपचा मंडळ अध्यक्ष बदलला जाणार आणि त्या ठिकाणी सचिन भोईर यांची नियुक्ती होणार हे दोन महिन्यापासूनच दिव्यातील शिवसेनेच्या नेत्यांना माहीत होतं.तशी चर्चा ते माझ्याजवळ आणि लोकांमध्ये करत होते.आमच्या पक्षात काय चालले आहे हे शिंदे गटाला आधीच माहीत होतं असा खळबळ जनक दावा भाजपचे रोहिदास मुंडे यांनी केला आहे.जिल्हा अध्यक्ष बदलल्या नंतर मंडळ अध्यक्ष बदलत असतात. पण कोणाला काढणार आणि कोणाला अध्यक्ष करणार हे विरोधी पक्षाच्या नेत्यांना कळत नसतं पण दिव्यात सर्व काही आधीच ठरले होते असं शिंदे गटाच्या भूमिकेवरून दिसते असे मुंडे यांनी म्हटले आहे.शिंदे गटाच्या दबावाखाली भाजपची पक्ष संघटना दिव्यात चालणार असेल तर भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांनी दिव्यात काम कसं करायचं? असा सवाल रोहिदास मुंडे यांनी विचारला आहे.आधीच शिंदे गटाने भाजपचे दोन मंडळ अध्यक्ष पळवले होते.ते दोन्हीही माजी मंडळ अध्यक्ष शिवसेनेत गेल्यानंतर भाजप खिळखिळी करण्यासाठी सर्व ताकद पणाला लावत होते. अशात भाजपचा किल्ला लढवत कार्यकर्त्यांना सोबत घेऊन मागील पाच वर्षांपासून भाजपचा दिव्यात विरोधक असणाऱ्या शिंदे गटाच्या नेत्यांच्या गैरकारभाराचे वाभाडे भाजपच्या माध्यमातून आम्ही काढत होतो.पाणी प्रश्न,आरोग्याचा प्रश्न,डम्पिंग ग्राउंड,अनधिकृत बांधकामे या विषयावर आंदोलने भाजपच्या माध्यमातून होत असल्याने मनमानी करणाऱ्या शिंदे गटाला अडचण होत होती.यातूनच दोन महिन्यापासून दिवा भाजपचा मंडळ अध्यक्ष बदलणार आणि सचिन भोईर यांना मंडळ अध्यक्ष करणार अशी उघड चर्चा दिवा शिवसेनेचे नेते करत होते.दिवा शिवसेनेच्या शिंदे गटाच्या नेत्यांनी सांगितल्याप्रमाणेच घडल्याने त्यांची भविष्यवाणी खरी ठरली आणि ही बाब धक्कादायक असल्याचे भाजपचे रोहिदास मुंडे यांनी म्हटले आहे.



# स्पीड लिमिटच्या नावाखाली होणारी वाहन चालकांची सरकारी लूट शासनाने थांबवावी

## निलेश चव्हाण यांची मागणी

**ठाणे : स्पीड लिमिटच्या नावाखाली होणारी छोट्या वाहन चालकांची लूट शासनाने थांबवावी व ताशी ८० किलोमीटरच्या खाली हायवेवर कोणताही दंड वाहन चालकांना आकारू नये अशा प्रकारची मागणी भाजपचे निलेश चव्हाण यांनी केंद्र व राज्य सरकारकडे केले आहे.**

देशातील अनेक हायवे गेल्या काही वर्षांपासून एक्सप्रेस वे झाले आहेत. त्यामुळे प्रवास जलद आणि स्वस्त होईल अशी सामान्यजनांची अपेक्षा होती. म्हणूनच लोकांनी टोल संस्कृतीचा देखील स्वीकार केला. पण लोकांची ही अपेक्षा फोल ठरली आहे. कारण टोलचे रस्ते पण खड्डेमय झाले आहेत. त्यातच भर म्हणजे प्रत्येक एक्सप्रेस वे वर वेगवेगळ्या कारणांसाठी वेगवेगळ्या वेग मर्यादा घालून लोकांना दोन हजार रुपयांचा दंड भरावा लागेल अशी व्यवस्था निर्माण करण्यात आली आहे आणि याविरोधात लोकांच्या मनात प्रचंड रोष आहे, असा आरोप ठाणे शहरातील भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते निलेश चव्हाण यांनी केला आहे.

निलेश चव्हाण यांनी त्यांच्या ट्विटर हॅन्डल वरुन या प्रश्नाबाबत केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितिन गडकरी, राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि दोन्ही उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले आहे. त्यासाठी त्यांनी मुंबई–नाशिक तसेच ईस्टर्न व वेस्टर्न महामार्गांचे उदहारण दिले आहे.

याबाबत निलेश चव्हाण यांना विचारले असता त्यांनी सांगितले की, समृद्धि महामार्गावर अवजड वाहनांसाठी ताशी ८० किमी, मध्यम आकाराच्या वाहनांसाठी ताशी १०० किमी तर लहान वाहनांसाठी ताशी १२० किमी ची वेग मर्यादा आहे. पण मुंबई–पुणे एक्सप्रेस वे साठी वेगळी वेग मर्यादा आहे. मुंबई–नाशिक एक्सप्रेस वे वर तर अजून वेगवेगळ्या वेग मर्यादा आहेत, कुठे ताशी ५५ तर कुठे ताशी ६५ तर कुठे ८०, मुंबई ईस्टर्न वे वर ताशी ७० किमी तर वेस्टर्न वे वर ताशी ८० किमी अशा वेगवेगळ्या वेग मर्यादा आहेत. वळण आणि घाट मार्गावर वेग कमी करणे अपेक्षित आहे पण अवजड, मध्यम आणि लहान वाहनांसाठी तो एकच कसा असू शकतो असा प्रश्न निलेश चव्हाण यांनी यावेळी उपस्थित केला आहे. जर अवजड वाहनासाठी वळण किंवा घाट मार्गावर ताशी ३० किमी चा वेग अपेक्षित असेल तर मध्यम वाहनासाठी तो ताशी ५० असला पाहिजे आणि लहान वाहनांसाठी तो ताशी ७० किमी असला पाहिजे.

राज्यात व देशात अनेक लहान वाहनांना ताशी ३५ किमी, ताशी ५३ किमी तर ताशी ७२ किमी अशा कमी वेगात वाहन असतानाही २००० रुपयांचा दंड आकारण्यात येत आहे. इतका कमी वेग ठेवल्यामुळे घाटात आणि वळण मार्गात वाहतूक कोंडी होत असून वेगावर लक्ष ठेवायचे की वळणांवर असा प्रश्न वाहनचालकांना पडत आहे. कारण लहान वाहने अगदी सहज हा वेग गाठतात असेही निलेश चव्हाण यांनी ट्वीट मधे नमूद केले आहे. लहान वाहनांना ताशी ८० किमी च्या वेगापर्यंत कोणताही दंड आकारण्यात येऊ नये, त्याचप्रमाणे सर्व एक्सप्रेसवे साठी समान वेग मर्यादा ठेवावी अशी मागणी केली आहे. तसेच देशातील महामार्गांवर जाहिर केलेल्या वेग मर्यादेवर १५ टक्के बफर / कुशन वेग ठेवण्याची तरतूद नियमात करण्याचे सुचवले आहे. म्हणजेच ताशी १०० किमी वेग असलेल्या महामार्गावर ताशी ११५ किमी वेगापर्यंत लहान वाहनांवर वेग मर्यादा उल्लंघन केल्याचा २००० रुपये दंड आकारण्यात येऊ नये अशी मागणी केली आहे.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि. १८ सप्टेंबर २०२३
पान : ४
www.diwanews.com

## इंडो–अमेरिकन चेंबरचे कार्य प्रशंसनीय – राज्यपाल बैस

**मुंबई :** गेल्या काही वर्षांमध्ये भारत – अमेरिका संबंधांमध्ये महत्वपूर्ण प्रगती झाली असून राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांच्या भारतभेटीमुळे हे संबंध आणखी मजबूत झाले आहेत. उभय देशांमध्ये व्यापार, तंत्रज्ञान व नाविन्यता या विषयांमध्ये सहकार्य सातत्याने वाढत आहे. भारत – अमेरिका व्यापार वाणिज्य संबंध वाढविण्यासंदर्भात इंडो–अमेरिकन चेंबर ऑफ कॉमर्सने आपल्या स्थापनेपासून केलेले कार्य प्रशंसनीय आहे, असे उद्गार राज्यपाल रमेश बैस यांनी आज येथे काढले.

# पर्यावरणभिमुख गणेशविसर्जनसाठी शहरातील ४२ ठिकाणी कृत्रिम तलाव

**ठाणे : ठाणे हे तलावांचे शहर असून पर्यावरणाच्या दृष्टीकोनातून तलावांचे संवर्धन व्हावे यासाठी गेली अनेक वर्षे ठाणे शहरातील घरगुती गणेश मूर्तींचे विसर्जन हे तलावात न करता ठाणे महानगरपालिकेच्या माध्यमातून तयार करण्यात येत असलेल्या कृत्रिम तलावात केले जाते. यावर्षी ठाणे शहरात कृत्रिम तलावांची संख्या वाढविण्यात आली असली तरी नागरिकांच्या सोईसाठी शहरातील विविध ४२ ठिकाणी टाकीमध्ये विसर्जन व्यवस्था करण्यात येणार आहे. जमिनीत खड्डा न खणता जमिनीवर कृत्रिम तलाव निर्माण केले जाणार असून नागरिकांनी पर्यावरणभिमुख घरगुती गणेश विसर्जन करावे असे आवाहन महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी केले आहे.**

## गृहसंकुले, नागरी वस्ती आदी ठिकाणी होणार टाकीमध्ये विसर्जन

### जमिनीत खड्डा न खणता जमिनीवर कृत्रिम तलावांची व्यवस्था

घरगुती गणेशमूर्तींचे विसर्जन हे दीड, पाच, सात, नऊ आणि अनंतचतुदर्शी दिवशी मोठ्या प्रमाणावर होत असते. नागरिकांची विसर्जनघाटावर गर्दी होवू नये तसेच पर्यावरणभिमुख गणेशविसर्जन व्हावे यासाठी शहरातील गृहसंकुले, नागरीवस्ती अशा विविध ४२ ठिकाणी टाकीमध्ये विसर्जन व्यवस्था करणार आहे. २ फूटापर्यंतच्या गणेशमूर्तींचे विसर्जन यामध्ये करता येईल असे मुख्य पर्यावरण अधिकारी मनिषा प्रधान यांनी नमूद केले.

उथळसर प्रभागसमितीअंतर्गत रुस्तमजी १, रुस्तमजी २ (अटायर बिल्डिंग), परुळेकर मैदान, सिध्देश्वर टाकी, रुणवालनगर नागेश्वरमंदिराजवळ, परमार्थ निकेतनसमोर, ठामपा मुख्यालजवळ. कळवा प्रभागसमिती अंतर्गत ९० फीट रोड कळवा, सह्याद्री शाळा, सायबा क्रीडा नगरी मनिषानगर, खारेगाव नाका पोलीस चौकीमागील मैदान कळवा पूर्व. दिवा प्रभागसमितीअंतर्गत पडले बीएसयूपी दिवा, माय सिटी दिवा प्रभागसमिती, कल्याणफाटा आरोग्य केंद्र, अरिहंत आरोही कल्याण शीळ रोड, दिवा महोत्सव मैदान दिवा शिळ रोड. नौपाडा प्रभाग समिती अंतर्गत रहेजा संकुल, कशिश पार्क, सद्गुरू गार्डन, बारा बंगला कोपरी, गावदेवी मैदान कोपरी. माजिवडा प्रभाग समिती अंतर्गत स्प्रिंग हिल सोसायटी वाघबीळ ते सरस्वती स्कूल रस्ता, विजयनगी ॲनेक्स, लोढा लक्झरीया माजिवडा, अर्बन पार्क गार्डन, हायलॅण्ड मैदान. मुंब्रा प्रभाग समिती अंतर्गत मुंब्रेश्वर शंकर मंदिर परिसर, शंकर मंदिर मुंब्रा. लोकमान्यनगर प्रभाग समिती अंतर्गत लोकमान्यनगर बसस्टॉप, लक्ष्मीपार्क– फेज १– सिद्धीविनायक उद्यान परिसर, आचार्य अत्रे मार्ग कोसरस नक्षत्र संकुल परिसर, दोस्तीविहार संकुल परिसर, पु.ल.देशपांडे मार्ग रुणवाल प्लाझा परिसर. वर्तकनगर प्रभागसमिती अंतर्गत वसंतविहार क्लब हाऊस, समतानगर वेल्फेअर सेंटर, पवारनगर बसस्टॉपजवळ, स्वामी विवेकानंद म्हाडा वसाहत, सिद्धांचल संकुल इलाईट गार्डनजवळ. वागळे प्रभागसमिती अंतर्गत रस्ता क्र. २२ नेप्चुन कंपनीजवळ, रस्ता क्र. २२ पासपोर्ट कार्यालयाजवळ, पाण्याच्या टाकीजवळ श्रीनगर, अयप्पा मंदिरासमोर श्रीनगर, हिंदुस्थान हॉटेलजवळ अंबिकानगर आदी ठिकाणी टाकीमध्ये विसर्जनव्यवस्था करण्यात आली आहे.



### नव्याने तयार करण्यात आलेले कृत्रिम तलावांची ठिकाणे

**बोरीवडे गाव येथील मैदान– ब्रह्मांड ऋतुपार्क, बायर हाऊस–कोलशेत– रेवाळे तलाव – माजिवडा, घोलाईनगर कळवा पूर्व –खारेगाव तलाव, न्यू शिवाजी नगर –कळवा, मासुंदा तलाव दत्त घाट– नौपाडा, घोसाळे तलाव, कृत्रिम तलाव – उथळसर, उपवन तलाव पायलादेवी मंदिर, नीळकंठ ग्रीन्स– वर्तकनगर प्रभाग समिती, रायलादेवी १– रायलादेवी –२ वागळे इस्टेट, खिडकाळी तलाव–मुंब्रा, दातिवली तलाव– दिवा,**

### मूर्ती स्विकृती केंद्राची ठिकाणे

**मढवी हाऊस, राम मारुती रोड, महागिरी कोळीवाडा, टेंभीनाका नौपाडा, जेल तलाव– उथळसर, देवदयानगर शिवाईनगर– वर्तकनगर, कामगार हॉस्पिटिल– लोकमान्यनगर, किसननगर बस स्टॉप, मॉडेला चेक नाका वागळे इस्टेट प्रभाग समिती, रिजन्सी हाईटस आझादनगर, लोढा लक्झेरिया माजिवडा.**

**तरी नागरिकांनी ठाणे महानगरपालिकेने उपलब्ध करुन दिलेल्या कृत्रिम तलाव, टाकीमध्ये विसर्जन तसेच मूर्ती स्विकृती केंद्र या ठिकाणी विसर्जन करुन महापालिकेस सहकार्य करावे असेही आयुक्त अभिजीत बांगर यांनी नमूद केले आहे.**

# आयुष्यमान भव मोहिमेत घेतली अवयवदान प्रतिज्ञा




**ठाणे:** ठाणे महानगरपालिका आणि सार्वजनिक आरोग्य विभाग ठाणे,यांच्या मार्फत बुधवार कोरस येथील लोकमान्य टिळक नर्सिंग होम येथे आयुष्मान भव मोहिमेचे उद्धाटन सोहळा ठामपा वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ चेतना नितील के तसेच उप वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. स्मिताली हमरस्कर यांच्या उपस्थित पार पडला. या कार्यक्रमासाठी लोकमान्यनगरचे ज्येष्ठ नागरीक तसेच शिवसेनेचे कार्यकर्ते सूर्यकांत शिंदे यांना प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ चेतना नितिल के यांनी आयुष्मान भव मोहिमेची माहिती दिली. तसेच अवयव दान प्रतिज्ञा कार्यक्रम घेण्यात आली. लोकमान्य टिळक नर्सिंग होम कोरस तसेच आ. ग जोशी प्रसूतीगृह मधील सर्व कर्मचारी यांनी ही अवयवदान प्रतिज्ञा घेतली.

# ठाणे काँग्रेसची माझा बाप्पा २०२३ पर्यावरण पूरक गणेशोत्सव सजावट स्पर्धा

**ठाणे :** ठाणे शहर (जिल्हा ) काँग्रेस कमिटीच्या वतीने यंदाही घरगुती आणि सार्वजनिक गणेशोत्सव सजावट स्पर्धा आयोजित केली आहे. घरोघरी तसेच सार्वजनिक मंडळांच्या माध्यमातून गणेशाच्या स्वागतासाठी आकर्षक अशी विविध फुलांची आरास,विद्युत रोषणाई तसेच सुंदर असे मखर व वेगवेगळ्या पद्धतींच्या सजावट करत असतात. त्यांच्या या कलेला वाव आणि प्रोत्साहन देण्यासाठी यंदा स्पर्धेत एकूण १९२ बक्षिसांची रेलचेल आहे . सोबतच स्पर्धकांना सन्मान चिन्ह आणि प्रमाणपत्र ही देण्यात येणार आहे असल्याची माहीती शहर काँग्रेस अध्यक्ष ॲड.विक्रांत चव्हाण यांनी दिली.

स्पर्धेत सहभागी होण्यासाठी स्पर्धकांनी काँग्रेस सांस्कृतिक विभाग अध्यक्ष स्वप्नील कोळी यांच्याशी (९१९९२०५३४७८८) या क्रमांकावर संपर्क साधून किंवा आपल्या बाप्पांच्या सजावटीचा फोटो,आपले नाव आणि पत्ता व्हॉट्सॲप करावा,तसेच अधिक माहिती साठी ठाणे शहर (जिल्हा) काँग्रेसचे मध्यवर्ती कार्यालय,जिल्हापरिषद कंपाऊंड,आमंत्रण हॉटेल समोर,ठाणे ( प ) येथे संपर्क करावा असे आवाहन ठाणे शहर काँग्रेसच्या वतीने करण्यात आले आहे.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि. १८ सप्टेंबर २०२३ | पान : ५
www.diwanews.com



## गॅस गळती होऊन घराला आग; एक जण किरकोळ जखमी

**ठाणे:** सिलिंडरमधून गॅस गळती होऊन घराला आग लागल्याची घटना कळवा पूर्व पौंडपाडा येथे शुक्रवारी सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास समोर आली. या आगीवर नियंत्रण मिळवताना स्थानिक नागरिक शत्रुघ्न ठाकूर (४३) हे जखमी झाले असून त्यांच्या पाठीला किरकोळ दुखापत झाली आहे. तसेच ही आग अर्ध्यातासात नियंत्रणात आली असून या आगीत घरामधील कपडे व इतर साहित्यांचे जळून नुकसान झाले आहे.

# बोगस शाळांमुळे विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान टळले

## आ. संजय केळकर यांच्या दट्यानंतर ठामपाची कायदेशीर कारवाई



**ठाणे:** ठाणे महापालिका क्षेत्रातील ४७ अनधिकृत (बोगस) शाळांवर कायदेशीर कारवाईसाठी ठाणे महापालिकेच्या शिक्षण विभागाने पावले उचलली आहेत. यापैकी आठ शाळा बंद झाल्या असुन शिक्षण विभागाने ४३ शाळां विरोधात पोलीस ठाण्यात एफआयआर दाखल केले आहेत, तर ३३ अनधिकृत शाळांची यु डायस रद्द करण्याची कार्यवाही सुरु केली आहे. आमदार संजय केळकर यांनी विधीमंडळात तसेच वारंवार केलेल्या पाठपुराव्याने अनधिकृत शाळांमुळे हजारो विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान टळले आहे. दरम्यान, ठाणे महापालिकेने आपल्या शाळा सक्षम करून ठोस उपाययोजना करण्याची सूचनाही आ. संजय केळकर यांनी केली आहे.

महापालिकेच्या शिक्षण विभागाने इंग्रजी माध्यमाच्या ४२, मराठी माध्यमाच्या २ आणि हिंदी माध्यमाच्या ३ अशा एकुण ४७ बोगस शाळांची यादी जाहिर करून अशा शाळांमध्ये पालकांनी आपल्या पाल्यांचे प्रवेश न घेण्याचे आवाहन केले होते.ठाणे मनपा क्षेत्रातील राबोडी, मानपाडा, डायघर गाव, सुभाषनगर आणि ढोकाळी येथे प्रत्येकी एक तर दिवा भागात सर्वाधिक अनधिकृत शाळा आहेत. सरकारची कोणतीही मान्यता न घेता अनधिकृतपणे या शाळा चालविण्यात येत असल्याचा मुद्दा आ. संजय केळकर यांनी विधीमंडळाच्या अधिवेशनात मांडुन विद्यार्थ्याच्या भवितव्याविषयी प्रश्न उपस्थित केला होता. त्यानंतर महापालिकेचे शिक्षणाधिकारी बाळासाहेब राक्षे यांनी, शिक्षण विभागाने अनधिकृत शाळावर केलेल्या कारवाईचा तपशील पेश केला आहे. ४७ पैकी ८ शाळा बंद झाल्या असुन दोन शाळांना शासनाकडून परवानगी मिळाली आहे. तर उर्वरीत शाळा बंद करण्याबाबत वारंवार नोटीसा बजावण्यासह दंडाच्या नोटीसाही बजावल्या होत्या.वेळोवेळी दिलेल्या नोटीसा व आदेशाचे पालन न केल्याने अखेर ४३ शाळांवर मुंब्रा पोलीस ठाण्यात एफआयआर दाखल करून कायदेशीर कारवाई करण्यासंदर्भात पत्रही दिले.तसेच, ३३ अनधिकृत शाळांची यु डायस रद्द करण्याची कार्यवाही सुरु केल्याचे राक्षे यांनी आ. केळकर यांना उत्तरादाखल सादर केलेल्या तपशीलात नमुद केले आहे.

---

## स्वच्छ वायू सर्वेक्षण स्पर्धेतील यशाबद्दल पर्यावरण विभागातर्फे ठाणे महापालिकेचे अभिनंदन

**ठाणे :** राष्ट्रीय पातळीवर स्वच्छ वायू सर्वेक्षण स्पर्धेत ठाणे महानगरपालिकेला तिसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल राज्य सरकारच्या पर्यावरण विभागातर्फे ठाणे महापालिकेचा सत्कार करण्यात आला. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण येथे जागतिक ओझोन दिनाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात प्रधान सचिव प्रवीण दराडे, महानगर आयुक्त संजय मुखर्जी, प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव अविनाश ढाकणे यांच्या हस्ते ठाणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त (२) प्रशांत रोडे यांनी हा सत्कार स्वीकारला. त्यावेळी, ठाणे महानगरपालिकेच्या उपायुक्त अनघा कदम, स्वच्छ वायू कार्यक्रम समन्वय अधिकारी तथा मुख्य पर्यावरण अधिकारी मनिषा प्रधान, उप पर्यावरण अधिकारी विद्या सावंत या उपस्थित होत्या.



## गुजराती सेल अध्यक्ष अशोक सोलंकी यांनी त्यांच्या टीम सोबत नवनिर्वाचित भाजपा दिवा मंडळ अध्यक्ष सचिन भोईर यांची घेतली भेट




**भाजपा, दिवा शीळ मंडळ अध्यक्ष पदी युवा नेता श्री सचिन रमेश भोईर ह्यांची निवड झाल्या बद्दल, गुजराती सेल अध्यक्ष श्री अशोक सोलंकी यांनी त्यांची टीम सोबत भेट घेतली व त्यांना शाल व पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा दिल्या.**

## गणेशोत्सवानिमित्त ठाण्यात आ. निरंजन डावखरे यांच्या हस्ते 'आनंदाचा शिधा' वाटप

**ठाणे:** राज्यातील महायुती सरकारमुळे गोरगरीब जनतेला सणासुदीत 'आनंदाचा शिधा' रूपाने मदतीचा हात मिळाला आहे. गणेशोत्सवानिमित्त राज्य सरकारच्यावतीने वाजवी दरात 'आनंदाचा शिधा' वाटप सुरू झाले आहे. भाजपाचे आमदार कोपरी–पाचपाखाडी विधानसभा मतदारसंघाचे निवडणुक प्रमुख ॲड. निरंजन डावखरे यांच्या हस्ते कोपरीत या उपक्रमाचा शुभारंभ गुरुवारी पार पडला. यावेळी शिधावाटप दुकानात नागरीकांना शिधावाटप करण्यात आले.

राज्य शासनाने जाहीर केलेल्या गरीब कल्याण योजने अंतर्गत सणांचा आनंद द्विगुणित करण्यासाठी सर्वसामान्यांचे सण आनंदात जाण्यासाठी ''आनंदाचा शिधा'' देण्यात येत असुन गणेशोत्सवानिमित्त शहरातील सर्व शिधावाटप दुकानांमधून आनंदाचा शिधा वाटप सुरू झाले आहे. त्या अंतर्गत कोपरी परिसरातील नागरिकांना आनंदाचा शिधावाटप करण्यात येत आहे. या कार्यक्रमाला आ.निरंजन डावखरे, माजी नगरसेवक भरत चव्हाण, कोपरी– पाचपाखाडी विधानसभा संयोजक, भाजपा स्लम सेलचे अध्यक्ष कृष्णा भुजबळ, भाजपा युवा मोर्चाचे प्रदेश सचिव ओमकार चव्हाण, उपाध्यक्ष राजेश गाडे, अमरीश ठाणेकर,शहर चिटणीस श्रुतिका मोरेकर – कोळी, कोपरी मंडळ अध्यक्ष शिवाजी रासकर, प्रमोद चव्हाण, सुचित्रा भोईर, गणेश भोईर, सचिन कुटे, शेखर निकम, दिगंबर रांधे आदींची उपस्थिती होती. या उपक्रमाबद्दल ठाण्यातील नागरिकांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच अजितदादा पवार यांचे आभार मानले आहेत.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि. १८ सप्टेंबर २०२३ | पान : ६
www.diwanews.com

## धोकादायक वाहनांमधून कचरा वाहतूक

**ठाणे :** मुख्यमंत्र्यांचे बदलते ठाणे या उपक्रमांतर्गत शहरातील स्वच्छतेकडे विशेष लक्ष दिले जात आहे शहरातील कचरा अधिक जलद आणि सफाईदारपणे उचलण्यासाठी नव्याने स्वच्छता यंत्रे महानगरपालिकेच्या वाहन ताफ्यात दाखल झाली आहेत. त्यातच दुसरीकडे ठाणे शहरात कचरा उचलण्यासाठी अँथोनी वेस्ट हँडलिंग सेल प्रायव्हेट लिमिटेड नावाने रजिस्टर असलेली खराब अवस्थेतील वाहने रस्त्यावरून धावताना दिसून येत आहेत. या वाहनांचे दरवाजे तुटलेले व गंजलेले आहेत.

# ठामपात अमृत कलश यात्रेस प्रारंभ

# अमृतकलश यात्रेस नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे महापालिकेचे आवाहन

**ठाणे : मेरी माटी मेरा देश अर्थात माझी माती माझा देश.. मातीला नमन वीरांना वंदन . देशासाठी बलिदान देणाऱ्या शूरवीरांना समर्पित अमृत कलश यात्रेचा प्रारंभ गुरुवारी महापालिका कार्यक्षेत्रात आयुक्त अभिजीत बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आला. या दुसऱ्या टप्प्यात ठाणे महापालिकेच्या विविध प्रभागसमिती कार्यक्षेत्रातील विभागातील नागरिकांकडून अमृतकलशामध्ये माती किंवा तांदूळ गोळा करण्यात येणार आहे.**





नौपाडा प्रभागसमिती हद्दीत अमृत कलश यात्रा काढून घराघरातून माती व तांदूळ जमा करण्यात आले, या यात्रेत ठाणे महापालिकेचे अधिकारी कर्मचारी, लोकप्रतिनिधी, टीडीआरएफचे जवान, सुरक्षारक्षक तसेच शाळांमधील स्काऊट गाईडचे विद्यार्थी सहभागी झाले होते. या अमृत कलश यात्रेस नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

राम गणेश गडकरी रंगायतन येथील आवारात पंचप्रण शपथ घेण्यात आली, यावेळी अग्नशिमक दलाच्यावतीने बँड वाजूवन या यात्रेचा प्रारंभ करण्यात आला. संपूर्ण मासुंदा तलावाभोवती काढण्यात आलेल्या या अमृत कलश यात्रेत घोडागाडी, अग्निशामक दलातील वाहने, रुग्णवाहिका, आपत्कालीन विभागाची वाहने आदी सहभागी झाले होते. सदरची अमृतकलश ३० सप्टेंबर पर्यत महापालिका कार्यक्षेत्रातील सर्व प्रभागसमिती अंतर्गत फिरणार आहे. या कलशामध्ये जमा झालेली माती व तांदूळ हे ठाणे महापालिका मुख्यालयाच्या माध्यमातून २७ ऑक्टोबर २०२३ रोजी ऑगस्ट क्रांती मैदान,मुंबई येथे पाठविण्यात येणार आहे. तद्नंतर हा अमृत कलश राज्यशासनामार्फत नवी दिल्ली मधील कर्तव्यपथ येथे उभारण्यात येणाऱ्या अमृतवाटिकेमध्ये मिसळण्यात येणार आहे. देशासाठी बलिदान देणाऱ्या शूरवीरांना समर्पित अमृत कलश यात्रा या अभियानामध्ये ठाणेकरांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आपला सेल्फी / फोटो/ व्हिडीओ .. या ई मेलवर पाठविण्यात यावे असे आवाहन ठाणे महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

नौपाडा प्रभागसमितीअंतर्गत काढण्यात आलेल्या या यात्रेत अतिरिक्त आयुक्त २ प्रशांत रोडे, उपायुक्त जी.जी. गोदेपुरे, उपायुक्त शंकर पाटोळे, परिवहन व्यवस्थापक भालचंद्र बेहेरे, माजी नगरसेवक संजय वाघुले, माजी नगरसेविका नम्रता कोळी, प्रतिभा मढवी सहभागी झाले होते.

# वडारवाडी येथील एसआरए योजनेला अखेर गती

## आ. संजय केळकर आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांची प्रत्यक्ष पाहणी

**ठाणे:** ठाण्यातील वडारवाडी येथील एसआरए प्रकल्प गेली अनेक वर्षे रखडल्याने येथील शेकडो रहिवासी हक्काच्या घरापासून वंचित आहेत. बुधवारी आमदार संजय केळकर यांनी एसआरए विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसह प्रकल्पाची प्रत्यक्ष पाहणी करून विकासकाला सक्त सूचना दिल्या. त्यामुळे या प्रकल्पाला गती येऊन घरे मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

वडारवाडी येथील शेकडो कुटुंबे सध्या एसआरए प्रकल्पामुळे भाडे कराराने अन्यत्र राहत आहेत. प्रकल्पाचे काम कासवगतीने सुरू असल्याने रहिवासी हक्काच्या घरांच्या प्रतिक्षेत आहेत. येथील रहिवाशांनी आमदार संजय केळकर यांची भेट घेतल्यानंतर गेल्या दोन वर्षांपासून केळकर याकामी पाठपुरावा करत आहेत.

येत्या डिसेंबरला रहिवाशांना घराच्या चाव्या देण्याचे विकासकाने मान्य केले होते, मात्र या मुहूर्तावरही घरे मिळणे अशक्य असल्याचे दिसत होते. अखेर आमदार केळकर यांनी एसआरए विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसह प्रकल्पाच्या ठिकाणी जाऊन पाहणी केली.

यावेळी विकासकाला सक्त सूचना देण्यात आल्यानंतर मनुष्यबळ वाढवून कामाचा वेग वाढवणार असल्याचे त्याने मान्य केले. तसेच मार्चमध्ये सर्व रहिवाशांना ओसीसह घराच्या चाव्या देण्याचे विकासकाने मान्य केल्याची माहिती केळकर यांनी दिली.

# ठाण्यात टोलनाक्याच्या दरवाढी विरोधात मनसेचे निवेदन

## मनसे पदाधिकाऱ्यांना केली अटक

**ठाणे:** ठाणे शहराच्या प्रवेशद्वारावर असलेल्या मुलुंड येथील टोल नाका प्रशासनाला बुधवारी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी येत्या १५ दिवसात जुलमी टोल वाढ रद्द केली नाहीतर तर तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे. तर, टोलनाका हा काही वर्षांपूर्वीच एमएसआरडिसी प्राधिकरण यांनी एमएमआरडीए यांना हस्तांतरित केला असून या टोल नाक्यावर आज ही वसुली एमएसआरडिसी च्या वतीने केला जात असून २१०० कोटीचा बोजा असून २०२३ पर्यंत आसपास सर्व मुंबई प्रवेश द्वराचे टोल नाके मिळून अंदाजी ४० हजार कोटी वसूल करण्यात आले आहे हा टोल नाका बंद होण्यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने वेळोवेळी निषेध व्यक्त केला असून ठाणेकर नागरिकांना टोल वसुलीचा होणारा त्रास सरकारच्या निदर्शनास आणून दिला आहे. येत्या १ ऑक्टोबरपासून होणारी दर वाढ त्वरित रद्द करण्याची मागणी मनसे नेते अविनाश जाधव यांनी केली असून येत्या १५ दिवसात प्रस्तावित दरवाढ रद्द केली नाही तर मनसे तीव्र आंदोलन चा पवित्रा घेईल व त्यास सर्वस्वी सरकार जबाबदार असेल निवेदन देण्यात येत असताना मनसे पदाधिकारी यांना नवघर पोलिसांनी अटक केली. त्यांना नोटीस बजावून सोडण्यात आले.

सदर विषयात मनसे शहर अध्यक्ष रवींद्र मोरे,मनसे जनहित विधी विधी शहर अध्यक्ष स्वप्नील महिंद्रकर,मनसे उपशहर अध्यक्ष पुष्कर विचारे, मनविसे सरचिटणीस संदीप पचांगे ,मंगेश पिंगळे,संदीप साळुंखे, सुशांत सूर्यराव व मनसैनिक उपस्थित होते.

दिवा न्यूज
दिशादर्शक, मार्गदर्शक!
सोमवार, दि. १८ सप्टेंबर २०२३
पान : ७
www.diwanews.com

## चिमुरडीवर अत्याचार करणाऱ्या नराधमाला २० वर्षे कारावासाची शिक्षा

**ठाणे:** पाच वर्षीय चिमुरडीला फूस लावून नेत, तिच्या लैंगिक अत्याचार करणाऱ्या सुरज बाळू महंतो याला ठाणे जिल्हा अतिरिक्त आणि विशेष न्यायालयाचे न्यायाधीश व्ही व्ही वीरकर यांनी मंगळवारी दोषी ठरवत, २० वर्षे कारावासाची शिक्षा सुनावल्याचे सरकारी वकील रेखा हिवराळे यांनी दिली. ही घटना २६ सप्टेंबर २०१८ रोजी भिवंडी, शांतीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली.

# मढवी जिंकले...!

**भाजपचा बदललेला मंडळ अध्यक्ष सध्या दिव्यात चर्चेचा विषय आहे.पक्ष मजबुतीसाठी संघटनात्मक बदल केले असल्याचे भाजप सांगत असली तरी दिव्यात मात्र युतीच्या राजकारणात रमाकांत मढवी हेच किंग असल्याची चर्चा जोरात आहे.मढवी यांनी केलेल्या राजकीय खेळीमुळे मागील पाच वर्षे संघर्ष करणारा मित्र पक्ष काहीसा शांत होईल असे चित्र आता दिव्यात आहे.**



दिवा न्यूज सडेतोड / सुहास खंडागळे

दिव्यात शिवसेनेला डोईजड झालेले भाजपचे माजी मंडळ अध्यक्ष रोहिदास मुंडे यांना नवनियुक्त जिल्हाध्यक्ष वाघुले यांनी बदलत सचिन भोईर यांची वर्णी मंडळ अध्यक्ष म्हणून लावली.मंडळ अध्यक्ष बदलणे हा भाजपचा पक्षांतर्गत विषय. मात्र याच विषयात रमाकांत मढवी यांची चर्चा होणे ही गोष्ट मढवी यांची दिव्यात ताकद वाढल्याचे प्रमाण आहे.शिवसेनेच्या दबावातून रोहिदास मुंडे यांना हटवले असे बोलले जाणे हे भाजपच्या राजकीय वाटचालीसाठी चांगले नाही. यामुळे भाजप बॅकफूटवर जाण्याची शक्यता अधिक आहे.रमाकांत मढवी यांच्या राजकीय डावपेचांनी याधीच भाजप अनेक वेळा गोंधळात पडलेली असताना आता तर सुरू असणाऱ्या चर्चांनी मढवी यांचे युतीतील नेतृत्व निर्विवाद सिद्ध केले आहे. मढवी यांना डावलून दिव्यात युतीचे राजकारण होणार नाही असाच काहीसा मेसेज या चर्चेमुळे जात असल्याचे बोलले जाते.भाजपचा मंडळ अध्यक्ष हटविण्यासाठी शिवसेनेचा दबाव या कदाचित राजकीय चर्चा असतील.या होणाऱ्या चर्चांचा साधा सोपा अर्थ काढायचा म्हटला तर मढवी जिंकले आहेत...आता पराभव कुणाचा झाला हे ज्याचे त्याने ठरवायचे आहे!

# घाटांचा विकास कूर्मगतीने; निकृष्ट दर्जाच्या कामावर बोट

## आमदार संजय केळकर यांची पाहणी

**ठाणे:** स्मार्ट सिटी योजनेंतर्गत ठाण्यात सुरू असलेल्या विसर्जन घाटांची विकासकामे निकृष्ट दर्जाची असून कूर्मगतीने सुरू आहेत. दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकारी आणि ठेकेदारांवर कारवाई करावी अशी मागणी आमदार संजय केळकर यांनी केली.

गणेशोत्सव तोंडावर आला असून स्मार्ट सिटी योजनेंतर्गत गणेश विसर्जन घाटांची कामे शहरात सुरू आहेत. शुक्रवारी आमदार केळकर यांनी साकेत-बाळकुम, कशेळी आणि कोलशेत या विसर्जन घाटांची पाहणी केली. यावेळी अधिकारी, ठेकेदार आणि स्थानिक पदाधिकारी उपस्थित होते.

पाहणी केल्यानंतर केळकर म्हणाले, विसर्जन घाट केवळ गणपती विसर्जनासाठी नसून त्याचा वापर वर्षभर विविध कार्यक्रम आणि सणांसाठी होतो. त्यामुळे या घाटांचे बांधकाम उच्च दर्जाचे आणि सुविधांनी युक्त असायला हवे. या विकासकामांसाठी १५ कोटी रुपये खर्च करण्यात येत आहेत. साधारणपणे ठेकेदारांना १८ महिन्यांचा कालावधी देण्यात येतो, मात्र या घाटांची कामे निकृष्ट दर्जाची असून ती कूर्मगतीने सुरू असल्याचे केळकर म्हणाले. याबाबत आयुक्तांशी बोलून संबंधित अधिकारी आणि ठेकेदारांवर कारवाई करण्याची मागणी करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

शहरातील रस्त्यांच्या कामासाठी राज्य सरकारने ६०५ कोटींचा निधी दिला. ही कामे झाल्यानंतर त्याचे थर्ड पार्टी ऑडिट केल्याशिवाय ठेकेदारांना बिले अदा करू नयेत, असे निर्देश आहेत. मात्र ऑडिटशिवाय बिले अदा केल्याचे आढळून येत आहे. या प्रकरणी आयुक्तांनी कोणाचाही मुलाहिजा न बाळगता ठेकेदारांना काळ्या यादीत टाकावे, अशी मागणी केळकर यांनी केली.



दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि. १८ सप्टेंबर २०२३ 

www.diwanews.com

### ठाण्यात लिफ्टचा रोप तुटल्याची दुर्दैवी घटना

**ठाणे:** ठाण्याच्या बाळकुम परिसरात लिफ्टचा रोप तुटून झालेल्या अपघातात आणखी एका कामगाराचा खासगी रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. यामुळे मृत कामगारांचा आकडा सात झाला असून सुनील कुमार दास (२१) असे कामगारांचे नाव असून त्याला रात्री उशीरा मृत घोषित करण्यात आल्याची माहिती ठाणे महापालिका आपत्ती व्यवस्थापन कक्षाच्या अधिकाऱ्यांनी दिली.


# दिवा शहराचे युवा नेतृत्व..!



दिवा शहराच्या विकासाची भूमिका

सर्वांना सोबत घेऊन जाण्याचा विश्वास

## सचिनजी भोईर

दिवा शहर मंडळ अध्यक्ष पदी नियुक्ती झाल्याबद्दल

## हार्दिक शुभेच्छा

भारतीय जनता पार्टी, दिवा शहर